# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.
दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/विवि/नोदणी प्रक्रिया/२०१९-२०/ 1942 दिनांक :- 08 MAY 2019

**परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या,
पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय/
शासन अनुदानित/विद्यापीठ विभाग/विद्यापीठ संचलित/स्वायत्त संस्था,
(पुणे विभाग ).

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता नोंदणी प्रक्रियेबाबत.

संदर्भ : १.मा.सचिव,प्रवेश नियाकम प्राधिकरण,मुंबई यांचे प्रत्र क्रमांक तंशिप १२१९/प्र.क्र ५७/प्रनिप्रा/३४२, दिनांक १८/०४/२०१९
२..मा.सचिव,प्रवेश नियाकम प्राधिकरण,मुंबई यांचे प्रत्र क्रमांक तंशिप १२१९/प्र.क्र ५७/प्रनिप्रा/३४३, दिनांक १८/०४/२०१९
३.मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र २ अ/एडीएम/२०११/३०७ दिनांक २०/०४/२०१९

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/शासन अनुदानित/विद्यापीठ संचलित/खाजगी विनाअनुदानित सर्व पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना सुचित करण्यात येते की, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या www.safalta.org या ऑनलाईन पोर्टलवर दिनांक २२/०४/२०१९ ते २२/०५/२०१९ या कालावधीमध्ये अभ्यासक्रमाची नोदणी प्रक्रिया पूर्ण करुन "परिशिष्ठ-ब" मध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे उपलोड/सादर करणे बंधनकारक आहे.

उपरोक्त नमूद कालावधीमध्ये ज्या संस्था प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यास ,कागदपत्रे/माहिती सादर करण्यास असमर्थ ठरतील अशा संस्था/महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभाग करण्यात येणार नाही, यांची सर्व संस्था प्रमुखांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

सोबत :- . 'परिशिष्ठ-अ'

आपला विश्वासु,

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए. के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ - २२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


महत्वाचे /कालमर्यादा/ईमेलद्वारे

क्रमांक-तंशिप्र-१२१९/प्र.क्र.५७/प्रनिंप्रा/३४२ दिनांक :१८एप्रिल, २०१९

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता नोंदणी प्रक्रियेबाबत.
संदर्भ : तंशिप्र-१२१९/प्र.क्र.५७/प्रनिप्रा/२५२ व २५४, दि.१९ मार्च, २०१९ रोजीची परिपत्रके.

विषयांकित प्रकरणी सर्व राज्यातील खाजगी विनाअनुदानित/ अल्पसंख्यांक आरोग्य विज्ञान/ तंत्रशिक्षण/ उच्च शिक्षण/ आयुष शिक्षण/ कृषी शिक्षण/ कला शिक्षण/ पशू व मत्स्य विज्ञान शिक्षण या अभ्यासक्रमांच्या महाविदयालयांना/संस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील पदव्युत्तर / पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया/प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेच्या प्रक्रियेसाठी प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या www.safalta.org या ऑनलाईन पोर्टलवर दिनांक २२/०४/२०१९ ते दिनांक २२/०५/२०१९ या कालावधीमध्ये महाविद्यालयाची/अभ्यासक्रमाची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करुन "परिशिष्ठ-ब" मध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे अपलोड/सादर करणे बंधनकारक आहे.

उपरोक्त नमूद कालावधीमध्ये जे महाविद्यालय/संस्था प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यास तसेच उक्त नमूद कागदपत्रे/माहिती सादर करण्यास असमर्थ ठरतील, अशा महाविद्यालय/संस्थां/अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रवेश प्रकियेमध्ये सहभाग करण्यात येणार नाही, याची सर्व संबंधीतांनी कृपया गांभीर्याने नोंद घ्यावी.

मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशावरुन.

(आ. ए. रायते) भा.प्र.से.
सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त व सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई

प्रति,

अधिष्ठाता/प्राचार्य,
राज्यातील सर्व खाजगी विनाअनुदानित/अल्पसंख्यांक व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये/संस्था.

प्रत वरीलप्रमाणे आवश्यक कार्यवाहीकरिता शासनाकडून प्रत्येक संचालकनिहाय अभ्यासक्रम विभागाचा एक जबाबदार अधिकारी नियुक्ती आदेश देण्याकरिताच्या विनंतीसह अग्रेषित,

१. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

# “ परिशिष्ठ-अ”

| तंत्रशिक्षण | | |
|---|---|---|
| अनु. क्र | व्यावसायिक अभ्यासक्रमाचे नाव | नोंदणीकरिता आवश्यक कागदपत्रे |
| १ | व्यवस्थापनशास्त्र | १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यतापत्र तसेच संबधीत शिखर परि षदे ची मान्यता (फार्मसी कॉन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली कॉन्सील ऑफ आर्कीटेक्चर, नवी दिल्ली )<br>२. शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता संबधीत विद्यापीठाचे संलग्निकरण<br>३. संस्थेच्या मान्यतेबाबत शासन निर्णय<br>४. शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी अंतिम केलेल्या शुल्काबाबतच माहिती/निर्णय<br>५. संबधीत संचालनालयाचे अंतिम मान्यतेचे पत्र<br>६. स्वायत्त संस्थांबाबत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे मान्यता पत्र<br>७. संस्थेचे अल्पसंख्याक दर्जा प्राप्त असल्यास त्याबाबत शासनाचे पत्र/प्रमाणपत्र<br>८. संस्थेविरुद्व कोणतेही न्यायालयीन प्रकरण किंवा गंभीर स्वरुपाची तक्रार प्रलंबित नसल्याबाबतचे लेखी हमीपत्र |
| २ | एम.सी.ए | |
| ३ | अभियांत्रिक (पदव्युत्तर पदवी/पदवी ) | |
| ४ | औषधनिर्माणशास्त्र (पदव्युत्तर पदवी/पदवी ) | |
| ५ | वास्तुशास्त्र (पदव्युत्तर पदवी/पदवी) | |
| ६ | एचएमसीटी (पदव्युत्तर पदवी/पदवी) | |
| ७ | प्लानीग | |